वन विभागातीत विविध संवर्गात काम
करणा–या कर्मचा–यांच्या/अधिका–यांध्या
वेतनप्रेणीत वाट करणे व हयांच्या दर्जात
सुधारणा करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग,

## शासन निर्णय क्र. एफएसटी १३८९/सी आर–६४४/फ–४,

## मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२, दिनाँक २५ जानेवारी, १९९०

# शासन निर्णय

वन विभागात सहाय्यक वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल, वनपाल आणि वनरक्षक या संवर्गात काम करणा – या वन कर्मचारी आणि अधिकारी यांच्या जबाबदा –या व कामाची व्याप्ती वाढल्यामुले त्यांच्या वेतनश्रेणी मध्ये सुधारणा करणे बाबत तसेच त्यांच्या मधील काही संवर्गाचा दर्जा वाढविण्याचा प्रश्न पाटी दा शासनाच्या विचाराधीन होता। या संबंधात शासनाने सांगोपांग विचार करुन खालील प्रमाणे निर्णय घेतला आहेः–

अ. सहाय्यक वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल, वनपात अणि वनरक्षक यांच्या प्रचलित वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे सुधारीत वेतन देण्यात यावे.

| पदांचे नांव | | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | सहाय्यक | २०००–६०–२३०० – दरो | २२००–७५–२८०० दरो |
| | वनसंरक्षक | ७५–३२००–१००–३५०० | १००–३७०० |
| २. | वनक्षेत्रपाल | १६४०–६०–२६००–दरो | २०००–६०–२३००–दरो |
| | (Forest Ranger) | ७५–२९०० | ७५–३२०० |
| ३. | वनपाल | १२००–३०–१४४०–दरो | १२००–३०–१५६०–दरो |
| | (Forester) | ३०–१८०० | ४०–२०४० |
| ४. | वनरक्षक | ७७५–१२–९५५–दरो | ८२५–१५–९००–दरो |
| | | १५–१०३०–२०–११५० | २०–१२००<br>वन रक्षांना विशेष वेतन मात्र देप्यात मेऊ नये. |

ब. सहाय्यक वनसंरक्षक आणि वनक्षेत्रपाल यांच्या विद्यमान अनुक्रमे वर्ग–२ आणि वर्ग – ३ च्या दर्जामध्ये वाढ़ करण्यात येऊन त्यांना अनुद्रमे, महाराष्ट्र वनसेवा वर्ग–१ आणि महाराष्ट्र वनसेवा वर्ग–२ चा राज्पत्रित दर्जा देण्यात यावा.

२. उपरोक्त सुधारीत वेतनश्रेणी नुसार सहाय्यक वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल, वनपाल आणि वनरक्षक या संवर्गासीत अधिकारी/कर्मचारी यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधीत नियम ११ (२) नुसार करण्यात यावी, तसेच सदरहू नियमांच्या नियम १५ नुसार देण्यात यावा.

शा.म.म.रोटा/म.व.व.वि./

३. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यानी विद्यमान वेतनश्रेणी चालू ठेवण्याचा किंवा सुधारीत वेतनश्रेणीत निवड करण्याया "विकल्प" सोबतथ्या प्रपत्रामध्ये या निर्णयाध्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्याकडे देण्यात यावा. मात्र

अ. जर विकल्प शासन निर्णयाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत संबंधित विभाग प्रमुखाला/कार्यालय प्रमुखात सादर न कल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी सुधारीत वेतनश्रेणी १.१.१९९० पासून स्वीकारली आहे असे गृहीत धरण्यात येईल.

ब. एकदा दिलेला विकल्प अंतीम गृहीत धरण्यात येईल.

४. सुधारीत वेतनश्रेणी मुळे होणारा खर्च "मागणी क्रमांक सी-१८-२४०६, वनीकरण व वन्यजीवन-००१ वनीकरण-००१ संचालन व प्रशासन-००१ (२) प्रादेशिक वन संरक्षक - (२४०६ ००४ २)" या लेखाशिर्याखाली दर्शविण्यात यावा आणि प्रथमतः हा खर्च आकस्मिक निधीतून मंजूर करण्यात आलेल्या (शासन ज्ञापन, वित्त विभाग क्रमांकः आकनि-१९९०/२२७/अर्धसंकल्प-४, दिनांक २४ जानेयारी, १९९०)

रु. १,००,०००/- (अधरी रुपये एक लाख फ्क्त) अग्रिमामधून भाग विण्यात यावा. सदर अग्रिम रक्कमेची नाममात्र (टोकन) पुरवणी मागणी पुढील अधिवेशनात विधानमंडलास तापर करुन परिपूर्ति करण्यात यावी.

५. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यानी आकस्मिकता निधी नियम सहा, आठ, आणि बारामध्ये आलेल्या तरतुदीये काटेकोरपणे पालन करून, महसूल व वन विभाग, वित्त विभाग, आणि महलेखापाल यांचेकडे आकस्मिकता निधीमधून खर्च केलेल्या रकमेचा अहवाल सादर करावा. यासंबंधात प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे लक्ष शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांकः १५७३/दोन/१३१२(दोन)/फ-२, दिनाँक ८ मे, १९७३ मधील सूचनांक्डे वेधण्यात येत आहे.

६. प्रधान मुख्य वनसंरक्षकानी वित्त विभागाच्या उपरोक्त ज्ञापनाद्वारे मंजुर करण्यात आलेगा आकस्मिकता निधी तम ेन संगणक कोई क्रमांक संबंधित आहरण व वितरण अधिकारी यांच्या निदर्शनात आणावा आणि या ढाढतया खर्च आकस्मिकता निधीमथ्ये िबनयूक दर्शविण्यात येईल याची दक्षता प्यावी.

७. सुधारीत वेतनश्रेणीची अंमलबजावणी दिनाँक १ जानेवारी, १९९० पासून

८. हा शासन निर्णय, वित्त विभागच्या तहमती ने आणि त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांकः सीआर-८३/९०-व्यय-१०, दिनॉक २२ जानेवारी, १९९० यास अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म.रा. पाडे.)
कार्यालय अधिकारी
महसूत व वन विभाग,

सोबतः विकल्पचा नमुना.
एच-११६० (१२००-२-९०)-१अ

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
व्यवस्थापकीय संचालक, फॉरेस्ट डेवलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट लिमिटे, नागपूर,
अपर मुख्य वनसंरक्षक (विसर्ग संरक्षक), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
अपर मुख्य वनसंरक्षक राष्ट्रीयकरण व मूल्यांकन, नागपूर,
सर्व वन संरक्षक